Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education,
Kolhapur Divisional Board, Kolhapur - 416004
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर - ४१६००४.

Phones : Chairman 2690829 Secretary 2691405 PBX-2696101,2696102,2696103

E-Mail: divsec.kop@gmail.com Web : sscboardkolhapur.in

परिपत्रक क्र.कोविमं/१२वी/खाजगी विद्यार्थी नावनोंदणी/ऑनलाईन/फेब्रुवारी-मार्च २०२४/1302

## विषय - उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) फेब्रुवारी- मार्च २०२४ च्या परीक्षेसाठी खाजगीरित्या प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन (ONLINE) नाव नोंदणी अर्जाबाबत..

कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना कळविण्यात येते की, फेब्रुवारी-मार्च २०२४ मध्ये होणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी ) परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थ्यांसाठी नावनोंदणी अर्जाबाबत (फार्म नं १७) ऑनलाईन (ONLINE) प्रक्रियेव्दारे दिनांक १०/०८/२०२३ पासून सुरु करण्यात येत असून खालील नमूद केलेल्या सूचना विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून त्यानुसार कार्यवाही करण्याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे.

१. इ.१२ वी खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्याच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या आहेत :-

| अ.क्र | नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्यासाठी तारखा | तपशील |
|---|---|---|
| १ | गुरुवार दिनांक १०/०८/२०२३ ते सोमवार दिनांक ११/०९/२०२३ | विद्यार्थ्यांनी नावनोंदणी अर्ज व शुल्क ऑनलाईन भरणे. |
| २ | शनिवार दिनांक १२/०८/२०२३ ते बुधवार दिनांक १३/०९/२०२३ | विद्यार्थ्यांनी मूळ अर्ज, ऑनलाईन नावनोंदणी अर्ज शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीच्या दोन छायाप्रती व मुळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये जमा करणे. |
| ३ | शुक्रवार दिनांक १५/०९/२०२३ | कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे अर्ज, ऑनलाईन नावनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीची एक छायाप्रत, मुळ कागदपत्रे व यादी विभागीय मंडळाकडे जमा करणे. |

२. खाजगी विद्यार्थ्यांनी इ.१२ वी साठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीनेच भरावयाचे आहेत. त्यामुळे कोणाचाही ऑफलाईन अर्ज स्विकारला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. सन २०२२ प्रमाणेच सप्टेंबर-ऑक्टोबर २०२२ मध्ये इ.१० वी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी फेब्रुवारी-मार्च २०२४ मध्ये होणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी ) परीक्षेस खाजगी विद्यार्थी म्हणून प्रविष्ट होण्यास सदरचे विद्यार्थी पात्र ठरतील.

विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी खालील वेबसाईटचा वापर करावा. अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर मराठी / इंग्रजी मधून उपलब्ध आहेत त्या वाचून अर्ज भरण्यास सुरूवात करावी.

**संकेतस्थळ** / Website **इ.१२वी** **http://form17.mh-hsc.ac.in**

३. विद्यार्थ्यांने ऑनलाईन अर्ज भरण्याकरिता **इ.१२वी साठी १) शाळा सोडल्याचा दाखला (मूळ प्रत) ,नसल्यास व्दितीयप्रत व प्रतिज्ञापत्र २) आधारकार्ड ३) इ.१०वी उत्तीर्णचे मूळ गुणपत्रक, ४) इ.१०वी उत्तीर्णचे मूळ प्रमाणपत्र ५) इ.१०वी उत्तीर्ण झालेनंतरचा गॅप जर दोन वर्षापेक्षा जास्त असेल तर त्याचे प्रतिज्ञापत्र ६) स्वत:चा पासपोर्ट आकारातील फोटो जवळ ठेवावा तसेच शाळा सोडल्याचा दाखला दिनांक ३१/०५/२०२२ पूर्वी काढलेला असावा.**

४. कागदपत्रे स्कॅन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्कॅनर / मोबाईलव्दारे कागदपत्रांचे फोटो काढून ते अपलोड करावेत. विद्यार्थ्यांचा मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी पुढील संपर्कासाठी अनिवार्य आहे.

५. संपूर्ण अर्ज भरुन झाल्यावर भरलेल्या अर्जाची प्रत विद्यार्थ्याला त्याने अर्जात नमूद केलेल्या ई-मेल वर पाठविली जाणार आहे. तसेच या संपूर्ण भरलेल्या अर्जाची प्रिंटआउट, ऑनलाईन शुल्क भरल्याची पावती व हमीपत्र यासह दोन प्रतीत काढून घ्यावी.

६. विद्यार्थ्यांनी अर्ज ऑनलाईन नाव नोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीच्या दोन छायाप्रती, माहिती पुस्तिकेत नमूद केल्याप्रमाणे आवश्यक प्रपत्रे व मुळ कागदपत्रे नाव नोंदणी अर्जावर नमूद केलेल्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये विहित मुदतीत जमा करावयाची आहेत.

७. खाजगी विद्यार्थ्यासाठी नावनोंदणी शुल्काचा तपशील खालीलप्रमाणे-

**इ.१२ वी - रु.६००/- नोंदणी शुल्क + रु.१००/- प्रक्रिया शुल्क (processing fee)**

८. शाळा सोडल्याचा दिनांक व दाखला दिल्याचा दिनांक याबाबत पात्रतेसाठी शाळा सोडल्याचा दिनांक ग्राह्य धरण्यात यावा.

९. विद्यार्थ्यांनी कनिष्ठ महाविद्यालयात अर्ज व ऑनलाईन शुल्क भरल्याच्या पावतीची छायाप्रत जमा केल्यानंतर संबंधित कनिष्ठ महाविद्यालयांनी सर्व अर्ज एकत्रित करुन पुढील नमुन्यातील यादी, मुळ अर्जासोबतची कागदपत्रे, ऑनलाईन नाव नोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीची एक छायाप्रत आणि माहिती पुस्तिकेत नमूद केल्याप्रमाणे आवश्यक प्रपत्रे संबंधित विभागीय मंडळात जमा करुन त्याबाबतची पोहोच घ्यावी. कोणताही विद्यार्थी सुविधेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

| अ.क्र. | अर्ज क्रमांक | विद्यार्थ्याचे संपूर्ण नाव | शुल्क (रुपये) | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | | | |

१०. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांनी नावनोंदणी ऑनलाईन करावयाची आहे. नावनोंदणी करताना विद्यार्थ्यांचा पत्ता, त्याने निवडलेली शाखा व माध्यम निहाय त्यास कनिष्ठ महाविद्यालयाची यादी दिसेल त्यामधील एका कनिष्ठ महाविद्यालयाची निवड विद्यार्थ्यांने करावयाची आहे. त्या कनिष्ठ महाविद्यालयाव्दारे परीक्षा अर्ज, प्रकल्प, प्रात्यक्षिक / तोंडी, श्रेणी परीक्षा द्यावयाच्या आहेत.

११. इ.१२ वी साठी विद्यार्थ्यांनी जे कनिष्ठ महाविद्यालय निश्चित केले असेल त्या कनिष्ठ महाविद्यालयांनी उपरोक्त १० मधील सर्व कामे करणे अनिवार्य असेल.

१२. इ.१२ वी फेब्रुवारी-मार्च २०२४ खाजगी विद्यार्थी फॉर्म नं.१७ ऑनलाईन नाव नोंदणी शुल्क ऑनलाईन पध्दतीने (Debit Card-Credit Card/UPI/Net Banking) व्दारे भरणे अनिवार्य राहिल. ऑनलाईन पध्दताने शुल्क जमा केल्यानंतर विद्यार्थ्याला पोचपावती प्राप्त होईल. सदर पोचपावती स्वत:जवळ ठेवून त्याच्या दोन छायाप्रती कनिष्ठ महाविद्यालयाला देण्यात याव्यात. तसेच एकदा नाव नोंदणी अर्ज सादर केल्यानंतर कोणत्याही कारणास्तव नाव नोंदणी शुल्क विद्यार्थ्याला परत केले जाणार नाही. तसेच नाव नोंदणी अर्जात दुरुस्ती करावयाची (उदा. माध्यम, शाखा, कनिष्ठ महाविद्यालय अथवा अन्य कारणास्तव) असल्यास विद्यार्थ्यास पुनश्च: नाव नोंदणी शुल्क जमा करावे लागेल याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

१३. विद्यार्थ्यांना नावनोंदणी प्रमाणपत्र ऑनलाईन देण्यात येणार आहे याची नोंद घ्यावी.

१४. विद्यार्थ्यांच्या अर्जासोबत मंडळाकडे छाननीसाठी दिलेली मूळ कागदपत्रे कनिष्ठ महाविद्यालयांनी मंडळाने सदरचे काम पूर्ण झालेनंतर मंडळाने परिपत्रकाव्दारे कळविलेल्या निर्धारित मुदतीत स्वखर्चाने कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रतिनिधींना अधिकारपत्रासह पाठवून मंडळ कार्यालयातून घेवून जाण्याची दक्षता घ्यावी.

१५. तसेच विद्यार्थ्यांनी अर्जासोबत छाननीसाठी दिलेली मूळ कागदपत्रे कनिष्ठ महाविद्यालयांकडून निर्धारित कालावधीनंतर परत घेवून जाण्याची दक्षता घ्यावी.

१६. दिव्यांग विद्यार्थ्यांना खाजगीरित्या प्रविष्ट व्हायचे असेल तर त्यांनी त्यांच्या दिव्यांगत्वाचे जिल्हा शल्य चिकित्सकांच्या/ प्राधिकृत केलेल्या हॉस्पिटलच्या प्रमाणपत्राची छायाप्रत प्रमाणित करून अर्जासोबत सादर करावी. दिव्यांग विद्यार्थ्यांना विषययोजना तसेच परीक्षेसाठी असलेल्या सवलती याबाबत शासन निर्णयानुसार मार्गदर्शन करण्यात यावे.

१७. ऑनलाईन अर्ज भरताना कोणतीही अडचण आल्यास कार्यालयीन वेळेत दुरध्वनी **क्र.०२०-२५७०५२०७/ २५७०५२०८/२५७०५२७१** वर संपर्क साधावा.

१८. पात्र विद्यार्थ्यांना नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांनी परीक्षेची आवेदनपत्रे मंडळाने विहित केलेल्या कालावधीत परीक्षा शुल्कासह भरणे आवश्यक असल्याबाबतची सूचना विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालयांनी करुन द्यावी.

१९. ज्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्याला कला, शास्त्र व वाणिज्य शाखेत प्रवेश घ्यायचा असेल त्या कनिष्ठ महाविद्यालयास सदरच्या शाखेस मंडळाची मान्यता असणे आवश्यक आहे. मंडळाची शाखा मान्यता नसलेस सदर शाखेसाठीचे प्रवेश देवू नयेत.

२०. ज्या कनिष्ठ महाविद्यालयामधून विद्यार्थी परीक्षेचा फॉर्म भरणार आहे त्याच कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत फॉर्म संदर्भातील अनुषंगिक कागदपत्रे जमा करण्यात यावीत.

२१. परराज्यातील विद्यार्थ्यांनी फॉर्म नं.१७ भरला असेल तर, ज्या कनिष्ठ महाविद्यालयामार्फत संबधित विद्यार्थी परीक्षेचे आवेदनपत्र भरणार आहे त्या कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत योग्यता प्रमाणपत्र ( ELIGIBILITY CERTIFICATE) अर्ज विभागीय मंडळाकडे येणे आवश्यक आहे.

२२. इतर शाळेतून इ.१० वी उत्तीर्ण ( इ.११ वी उत्तीर्ण/ अनुत्तीर्ण ) झालेल्या तसेच आपल्या शाळेतून इ.१० वी उत्तीर्ण झालेल्या तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील माजी विद्यार्थ्यांचे( इ.११ वी उत्तीर्ण/ अनुत्तीर्ण ) ऑनलाईन नाव नोंदणी अर्ज क्र.१७ स्विकारणे आपणास बंधनकारक आहे. सर्व पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज क्रमांक १७ सादर करून घ्यावेत. जेणेकरून हे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित न राहता शिक्षणाच्या प्रवाहात येतील. तसेच जी कनिष्ठ महाविद्यालये तालुक्यातील इतर शाळा अथवा कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्याचे ऑनलाईन नाव नोंदणी अर्ज (फॉर्म नं.१७) स्वीकारीत नाहीत त्यांच्या बाबत अशी लेखी तक्रार प्राप्त झाल्यास त्यासंबंधित मुख्याध्यापक / प्राचार्यांविरूध्द योग्य ती कारवाई करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

२३. **कोणत्याही खाजगी विद्यार्थ्यास तांत्रिक / व्यावसायिक / किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम गटातील विषय उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेसाठी घेता येणार नाहीत. याची स्पष्ट जाणीव विद्यार्थ्यास द्यावी.** तसेच विषय योजनेप्रमाणे विषयाची निवड विद्यार्थ्याने केल्याची खात्री करावी. चुकीच्या विषयाची निवड विद्यार्थ्यांने केल्याचे निदर्शनास आल्यास व त्यांमुळे विद्यार्थ्यांचे नुकसान झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी मुख्याध्यापकांची/ प्राचार्यांची राहील. तसेच शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१९/प्र.क्र.(२४३/१९)/एसडी-४, दि.०८ ऑगस्ट २०१९ व शासन शुध्दीपत्रक क्रमांक -अभ्यास-२११८/प्र.क्र.२४३/एसडी-४, दि.११ नोव्हेंबर २०१९ च्या सुधारित विषय योजना व मूल्यमापन योजनेप्रमाणेचे परीक्षेसाठी विषयांची निवड करावी लागेल.

२४. परीक्षेचे आवेदनपत्र विद्यार्थ्याकडून निर्धारित मुदतीत भरून घेणे, विद्यार्थ्यांच्या तोंडी / प्रात्यक्षिक परीक्षेचे आयोजन करून मंडळास निर्धारित मुदतीत गुण कळविणे, पर्यावरण विषयक अभ्यासक्रम व प्रकल्प सेमिनार/ जर्नल पूर्ण करून घेऊन त्या विषयाचे गुण मंडळास कळविणे तसेच आरोग्य व शारीरिक शिक्षण या विषयाची परीक्षा घेऊन निर्धारित मुदतीत त्याची श्रेणी मंडळास कळविणे याची संपूर्ण जबाबदारी संबंधित मुख्याध्यापक/ प्राचार्यांची आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

२५. **विनियम क्र.८९ (१२) अन्वये निर्धारित प्रात्यक्षिके पूर्ण करून घेण्यासाठी , शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय ,मुंबई - ३२ यांचे पत्र क्र.एसएससी/२००२ (२३१) उमाशि-२ दि.२६/११/२००२ नुसार, खाजगी विद्यार्थ्यांनी घेतलेल्या ज्या विषयात प्रात्यक्षिके विहित केलेली असतील त्या विषयातील प्रात्यक्षिके पूर्ण करण्यासाठी ऑन लाईन नाव नोंदणी अर्ज (फॉर्म नं.१७) पाठविणाऱ्या उच्च माध्यमिक शाळेस/ कनिष्ठ महाविद्यालयास खाजगी विद्यार्थ्यास सुविधा उपलब्ध करून देण्याप्रित्यर्थ संबंधित विद्यार्थ्याकडून एकवट शुल्क रूपये १००/- घेता येईल.**

२६. प्रत्येक ऑनलाईन नाव नोंदणी अर्जासोबत (फॉर्म नं.१७) सादर केलेल्या सर्व कागदपत्रांची यादी जोडणे आवश्यक आहे.

२७. उमेदवार कनिष्ठ महाविद्यालयीन प्रथम वर्षाची परीक्षा (इ.११ वी ) उतीर्ण किंवा अनुत्तीर्ण असेल तर त्याचे नाव संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाच्या हजेरी पटावर पुढील शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी नसावे.

२८. **अपूर्ण/चुकीची माहिती ऑनलाईन नोंदविलेल्या, अपूर्ण कागदपत्रे असलेल्या, कमी शुल्क भरलेले ऑनलाईन नाव नोंदणी अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत आणि अशा अपूर्ण अर्जावर कार्यवाही केली जाणार नाही. तसेच पोस्टाद्वारे पाठविलेले ऑनलाईन नाव नोंदणी अर्ज (फॉर्म नं.१७) स्वीकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.**

२९. ऑनलाईन नाव नोंदणी अर्ज (फॉर्म नं.१७) हा परीक्षेचा फॉर्म नसून तो केवळ खाजगीरितीने परीक्षेसाठी प्रविष्ठ होण्यास पात्रता ठरविण्यासाठी केलेला अर्ज आहे, याची विद्यार्थ्यांना ऑनलाईन नाव नोंदणी अर्ज (फॉर्म नं.१७) भरतानाच लेखी सूचना द्यावी. मंडळाने त्यास पात्र ठरवून दिलेल्या खाजगी विद्यार्थ्यांच्या परीक्षेची आवेदनपत्रे विहित शुल्कासह निर्धारित मुदतीत मंडळाकडे सादर करणे आवश्यक आहे याची कटाक्षाने नोंद घ्यावी.

३०. **विद्यार्थी विषय व शाखा बदलाकरिता ऐन वेळेस अर्ज करतात. त्यामुळे ते कोणते विषय घेणार याची माहिती अगोदरच घ्यावी. विद्यार्थ्यास व्दितीय भाषेऐवजी माहिती तंत्रज्ञान हा विषय घेता येईल. मात्र सदर विषयास संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाने मान्यता घेतलेली असावी. तसेच कनिष्ठ महाविद्यालयाची प्रयोगशाळेची क्षमता असावी.**

३१. ऑनलाईन नावनोंदणी अर्ज क्र.१७ सादर करू इच्छिणाऱ्या उमेदवारांने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा इंग्रजी विषयासह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. ही बाब संबंधित विद्यार्थ्यास स्पष्ट करण्यात यावी.

३२. ऑनलाईन नावनोंदणी अर्ज फॉर्म नं.१७ भरून खाजगीरितीने उच्च माध्यमिक प्रमाणपत्र वा तत्सम परीक्षेत विषयात किमान ३५ टक्के गुण असावेत. तसेच ज्या कनिष्ठ महाविद्यालयास मंडळाची मान्यता देण्यात आलेली आहे, अशा कनिष्ठ महाविद्यालयातूनच ऑनलाईन नाव नोंदणी अर्ज फॉर्म नं.१७ मंडळाकडे पाठविणे बंधनकारक आहे.

३३. इतर राज्यातील विद्यार्थ्यांचे ऑनलाईन नावनोंदणी अर्ज फॉर्म नं.१७ मंडळाकडे पाठविण्यापूर्वी मंडळाकडून योग्यता प्रमाणपत्र घेऊन ते योग्यता प्रमाणपत्र ऑनलाईन नाव नोंदणी फॉर्म ने.१७ सोबत जोडणे आवश्यक आहे.

३४. महाराष्ट्र राज्याबाहेरील मंडळाची इ.१० वी उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांनी संबंधित विभागीय मंडळाकडे योग्यता प्रमाणपत्राची मागणी करणे आवश्यक आहे. योग्यता प्रमाणपत्र विहित कालावधीत प्राप्त करून घेणे गरजेचे आहे. अन्यथा मंडळाने वेळोवेळी वितरीत केलेल्या परिपत्रकानुसार दंड भरावा लागेल. कनिष्ठ महाविद्यालयाने प्राप्त मंडळ सूचनांनुसार सत्वर कार्यवाही करणे आवश्यक आहे.

३५. **एकदा इ. १२ वी परीक्षा उत्तीर्ण / अनुत्तीर्ण तसेच तुरळक विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ऑन लाईन नावनोंदणी अर्ज क्र.१७ भरता येणार नाही. अशा विद्यार्थ्यांचे नावनोंदणी अर्ज मंडळाकडे पाठवू नयेत. त्यांची पुनर्परीक्षार्थी परीक्षा आवेदन पत्रे सादर करावीत याची प्राचार्यांनी कटाक्षाने नोंद घ्यावी.**

३६. **नियम क्र.८९(३) अन्वये कोणत्याही कनिष्ठ महाविद्यालयास ५० पेक्षा जास्त खाजगी विद्यार्थ्यांचे अर्ज स्विकारता येणार नाहीत. अपवादात्मक परिस्थितीत ५० विद्यार्थ्यांच्या प्रवेश क्षमतेपेक्षा जास्तीचे अर्ज प्राप्त झाल्यास विभागीय मंडळाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील.**

**या संदर्भातील माहिती व मार्गदर्शक पुस्तिका या परिपत्रकासोबत देण्यात येत आहे. तसेच सदर माहिती व मार्गदर्शक पुस्तिका मंडळाच्या संकेतस्थळावर http://mahahsscboard.in प्रसिध्द करण्यात येत आहे.**

स्थळ :- कोल्हापूर.
दिनांक:-०९/०८/२०२३

( डी.एस. पोवार )
विभागीय सचिव,
कोल्हापुर विभागीय मंडळ,कोल्हापूर

प्रति,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालयांचे प्राचार्य
जिल्हा:- सातारा/ सांगली/ कोल्हापूर.
प्रत माहितीस्तव:- १) मा. शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.
२) शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, सातारा/सांगली/कोल्हापूर.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४.

# उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा
## इयत्ता १२ वी

## खाजगी विद्यार्थी
## थेट अर्ज योजना

## खाजगी विद्यार्थी (फॉर्म नं. १७)
## माहिती व मार्गदर्शक सूचना

## उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस खाजगीरित्या प्रविष्ठ होऊ इच्छिणाऱ्या उमेदवारासाठी पात्रतेच्या अटी

१. माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ. १०वी) किंवा राज्याबाहेरील तत्सम समकक्ष परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर दोन विद्या वर्षानंतर इयत्ता बारावी परीक्षेस प्रविष्ठ होण्यास पात्र होईल. (उदा. एखाद्या विद्यार्थ्याने माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा जुलै–ऑगस्ट २०२२ मध्ये उत्तीर्ण झालेले विद्यार्थी फेब्रु–मार्च २०२४ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ठ होण्यासाठी तो पात्र ठरेल.

२. जे उमेदवार कनिष्ठ महाविद्यालयीन प्रथम वर्षाची परीक्षा (इ. ११ वी) उत्तीर्ण किंवा अनुत्तीर्ण असतील, तर त्यांचे नाव संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाच्या हजेरी पटावर ३१ मे नंतर नसावे.

३. माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा अथवा समकक्ष परीक्षा इंग्रजी विषयासह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

४. पदविका (डिप्लोमा) धारक किंवा अन्य कोणतीही शैक्षणिक अर्हता प्राप्त विद्यार्थी अट क्र. १ पूर्ण करत असेल तर तो पात्र असेल.

५. तंत्रिक/व्यावसायिक/किमान कौशल्य अभ्यासक्रम गटातील विषय घेता येणार नाही.

६. नाव नोंदणी अर्ज (फॉर्म नं. १७) भरून खाजगीरितीने उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस विज्ञान शाखेअंतर्गत नाव नोंदणी करणाऱ्या विद्यार्थ्यास माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र वा तत्सम परीक्षेस विज्ञान विषयात किमान ३५ टक्के गुण असावेत, तसेच ज्या कनिष्ठ महाविद्यालयास विज्ञान शाखेस मंडळाची मान्यता देण्यात आलेली आहे, अशा कनिष्ठ महाविद्यालयातूनच नाव नोंदणी अर्ज (फॉर्म नं. १७) मंडळाकडे पाठविणे बंधनकारक आहे.

७. शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१९/प्र.क.(२४३/१९)/एसडी -४, दि. ०८ ऑगस्ट २०१९ व शासन शुद्धीपत्रक क्रमांक-अभ्यास-२११८/प्र.क.२४३/एसडी -४, दि. ११ नोव्हेंबर २०१९ च्या सुधारित विषय योजना व मूल्यमापन योजनेप्रमाणेच परीक्षेसाठी विषयांची निवड करावी लागेल.

८. विद्यार्थ्यास द्वितीय भाषेऐवजी माहिती तंत्रज्ञान हा विषय घेता येईल. मात्र सदर विषयास संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाने मान्यता घेतलेली असावी. तसेच कनिष्ठ महाविद्यालयाची प्रयोगशाळेची क्षमता असावी.

९. महाराष्ट्र राज्याबाहेरील मंडळाची इ. १० वी उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांची संबंधित विभागीय मंडळाकडे योग्यता प्रमाणपत्राची मागणी करणे आवश्यक आहे. योग्यता प्रमाणपत्र विहित कालावधीत प्राप्त करून घेणे गरजेचे आहे, अन्यथा मंडळाने वेळोवेळी वितरीत केलेल्या परिपत्रकानुसार दंड अनुज्ञेय राहील. कनिष्ठ महाविद्यालयानी मंडळ सूचनानुसार सत्वर कार्यवाही करणे आवश्यक आहे.

१०. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी)परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांनी ऑनलाइन नावनोंदणी करतांना विद्यार्थ्याचा पत्ता, त्याने निवडलेली शाखा व माध्यम निहाय कनिष्ठ महाविद्यालयाची यादी विद्यार्थ्यास दिसेल. त्यामधील एका कनिष्ठ महाविद्यालयाची निवड विद्यार्थ्याने करावयाची आहे. या कनिष्ठ महाविद्यालयाद्वारे परीक्षा अर्ज, प्रकल्प, प्रात्यक्षिक/तोंडी, श्रेणी परीक्षा द्यावयाच्या आहेत.

११. दिव्यांग विद्यार्थ्यांना खाजगीरित्या प्रविष्ठ व्हायचे असेल तर त्यांनी त्यांच्या दिव्यांगत्वाचे जिल्हा शल्य चिकित्सकांच्या/प्राधिकृत केलेल्या रुग्णालयांच्या प्रमाणपत्राची छायप्रत प्रमाणित करून अर्जसोबत सादर करावी.

## नाव नोंदणी अर्जासोबत (फॉर्म नं. १७) विद्यार्थ्यांनी सादर करावयाची कागदपत्रे

## नाव नोंदणी अर्ज क्र.१७ सोबत कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांनी/ विद्यार्थ्यांनी पुढील कागदपत्रे सादर करावीत.

१. इ. १० वी ची मूळ गुणपत्रिका व एक प्रमाणित छायाप्रत.
२. इ. १० वी उत्तीर्णतेचे मूळ प्रमाणपत्र व एक प्रमाणित छायाप्रत.
३. इ. १० वी/ इ. ११ वी शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय/पॉलिटेक्निक सोडल्याचा मूळ दाखला (Original T.C.) व एक प्रमाणित छायाप्रत, दुय्यम दाखला (Duplicate T.C.)जोडल्यास मागील दोन वर्षात कनिष्ठ महाविद्यालयीन वर्गात नियमित विद्यार्थी म्हणून प्रवेश घेतला नसल्याबाबत प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक आहे.
४. इ. ११ वी परीक्षेची मूळ गुणपत्रिका व एक प्रमाणित छायाप्रत.
५. रहिवासी पुरावा- रेशनकार्ड /आधार कार्ड/ मतदान ओळखपत्र/ सक्षम अधिकाऱ्यांचे (विद्यार्थ्यांच्या पालकांच्या बदली आदेशाची प्रमाणित छायाप्रत)
६. विद्यार्थ्यांचे विहित नमुन्यातील हमीपत्र (प्रपत्र क्रमांक-१)
७. शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय सोडल्याचा मूळ दाखला (Original T.C.) न जोडता दुय्यम दाखला (Duplicate T.C.) जोडल्यास मूळ दाखला का सादर करू शकत नाही याचे कारण नमूद करून व मागील दोन वर्षात कनिष्ठ महाविद्यालयीन वर्गामध्ये नियमित विद्यार्थी म्हणून प्रवेश घेतला नसल्याबाबत रु.१००/- च्या जनरल स्टॅम्प पेपरवर कोर्ट फीसह केलेले प्रतिज्ञापत्र (AFFIDAVIT) जोडणे आवश्यक आहे. नमूना सोबत जोडला आहे. (प्रपत्र क्रमांक -२)
८. पूर्व परवानगी शिवाय खाजगी विद्यार्थ्यांचे ५० पेक्षा जास्त फॉर्म नं. १७ न पाठवू नयेत .
९. भाषा विषय तोंडी परीक्षा, पर्यावरण विषयाचा अभ्यासक्रम व प्रकल्प, प्रात्यक्षिके पूर्ण करून घेण्याबाबतचे हमीपत्र (प्रपत्र क्रमांक–अ )
१०. नाव नोंदणी शुल्क जमा करण्याबाबतचे विवरणपत्र (प्रपत्र क्रमांक–क ).
११. प्रत्येक नावनोंदणी अर्जासोबत विद्यार्थ्यांने सादर केलेल्या सर्व कागदपत्रांची यादी नमूद करावी.
१२. खाजगी विद्यार्थ्याने घेतलेल्या विषयात प्रात्यक्षिके असतील तर त्यास ती पूर्ण करण्यासाठी मिळणाऱ्या सुविधेसाठी कनिष्ठ महाविद्यालयाकडे एकत्रित शुल्क रु. १०० /- भरावे लागतील.
१३. अपूर्ण/चुकीची माहिती नोंदविलेल्या, अपूर्ण कागदपत्रे असलेल्या, कमी शुल्क भरलेल्या नाव नोंदणी अर्जावर (फॉर्म नं. १७) कार्यवाही केली जाणार नाही. तसेच पोस्टाद्वारे पाठविलेले अर्ज स्वीकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी.
१४. इ. १२ वीच्या नियमित परीक्षेसाठी कोणताही (फॉर्म नं. १७ सहित) खाजगी विद्यार्थी क्रीडा सवलतीच्या अतिरिक्त गुणांसाठी पात्र राहील. सदर गुण केवळ उत्तीर्ण होण्यासाठी लागू राहतील. संबंधित विद्यार्थ्यांनी आपल्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत सादर प्रस्ताव विहित नमुन्यात व विहित मुदतीत प्रमाणपत्राच्या छायांकित प्रतीसह मान्यतेसाठी मंडळ कार्यालयात सादर करणे आवश्यक राहील.
१५. विद्यार्थ्याने ज्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातून खाजगी विद्यार्थी म्हणून नावनोंदणी केली असेल त्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयास जे परीक्षा केंद्र आहे त्याच परीक्षा केंद्रावर परीक्षा देणे बंधनकारक राहील.

## नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरावयाच्या सूचना

१) खाजगी विद्यार्थ्यांनी इ.१२ वीसाठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरावायचे आहे. त्यामुळे कोणाचाही ऑफलाइन अर्ज स्विकारला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

२) विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी खालील वेबसाईटचा वापर करावा. अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर मराठी/इंग्रजीमधून उपलब्ध आहेत त्या वाचून अर्ज भरण्यास सुरुवात करावी. संकेतस्थळ - **http://form17.mh-hsc.ac.in**

३) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांची नावनोंदणी ऑनलाईन होणार आहे. यामध्ये विद्यार्थ्यास त्याच्या पत्त्यानुसार व त्याने निवडलेल्या माध्यमनिहाय महाविद्यालयांची यादी दिसेल त्यापैकी विद्यार्थी शेवटी ज्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात जात होता ते महाविद्यालय किंवा त्याच्या घरच्या पत्त्यानुसार सर्वात जवळच्या कनिष्ठ महाविद्यालयाची निवड विद्यार्थ्याने करावयाची आहे. या कनिष्ठ महाविद्यालयाद्वारे परीक्षा अर्ज, प्रकल्प, प्रात्यक्षिक परीक्षा, श्रेणी विषया संदर्भातील कामकाज व अनुषंगिक मूल्यमापन करावयाचे आहे.

४) विद्यार्थ्याने अर्ज भरण्याकरिता १) शाळा सोडल्याचा दाखला (मूळ प्रत), २) मूळ प्रत नसल्यास, द्वितीयप्रत असल्याचे कार्यकारी दंडाधिकारी /नोटरी यांचे प्रतिज्ञापत्र ३) आधारकार्ड ३) स्वत:चा पासपोर्ट आकारातील फोटो ऑनलाईन अर्ज भरताना सदर कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करावयाची आहेत. काही कारणास्तव विद्यार्थ्याकडे दुय्यम शाळा सोडल्याचा दाखला असेल तर प्रपत्र-२ (प्रतिज्ञा पत्राचा नमूना) जोडणे आवश्यक आहे.

५) विद्यार्थ्यांनी शेवटी सोडलेली शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय हे संबंधित विभागीय मंडळाच्या अधिकार क्षेत्राबाहेरील असेल तर दाखल्याच्या (T.C./L.C.) पाठीमागे सदर दाखला अधिकृत असल्याबाबत संबंधित जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी / किंवा शिक्षण निरीक्षक / गट शिक्षणाधिकारी यांची प्रतिस्वाक्षरी आवश्यक आहे. परराज्यातील विद्यार्थी असेल तर त्याच्या सक्षम अधिकाऱ्याचे प्रतिस्वाक्षरी आवश्यक आहे.

६) कागदपत्रे स्कॅन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्कॅनर/ मोबाईलद्वारे कागदपत्रांचे फोटो काढून ते अपलोड करावेत. विद्यार्थ्यांचा मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी पुढील संपर्कासाठी अनिवार्य आहे.

७) संपूर्ण अर्ज भरून झाल्यावर भरलेल्या अर्जाची प्रत विद्यार्थ्याला त्याने अर्जात नमूद केलेल्या ई-मेल वर पाठवली जाणार आहे. तसेच या संपूर्ण भरलेल्या अर्जाची प्रिंटआऊट, ऑनलाइन शुल्क भरल्याची पावती व हमीपत्र यासह दोन प्रतीत काढून घ्यावी.

८) खाजगी विद्यार्थी फॉर्म नं. १७ नावनोंदणी शुल्क ऑनलाइन पद्धतीने (Debit card / Credit card/ UPI / Net Banking द्वारे) भरणे अनिवार्य राहील. ऑनलाइन पद्धतीने शुल्क जमा केल्यानंतर विद्यार्थ्याला पोचपावती प्राप्त होईल. सादर पोचपावती स्वतः जवळ ठेवून त्याच्या दोन छायाप्रती संबंधित कनिष्ठ महाविद्यालयास देण्यात याव्यात तसेच एकदा नावनोंदणी अर्ज सादर केल्यानंतर कोणत्याही कारणास्तव नावनोंदणी शुल्क विद्यार्थ्यास परत केले जाणार नाही, तसेच नावनोंदणी अर्जात दुरूस्ती करवायची (उदा. माध्यम, शाखा, कनिष्ठ महाविद्यालय अथवा अन्य कारणास्तव) असल्यास विद्यार्थ्यास पुनश्च नावनोंदणी अर्ज व शुल्क ऑनलाइन जमा करावे लागेल.

९) विद्यार्थीनी अर्ज ऑनलाईन नावनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीच्या दोन छायाप्रती व मूळ कागदपत्रे नाव नोंदणी अर्जावर नमूद केलेल्या कनिष्ठ महाविद्यालयात विहित मुदतीत जमा करावयाची आहेत.

खाजगी विद्यार्थ्यांसाठी नाव नोंदणी शुल्काचा तपशील खालीलप्रमाणे –

इ. १२ वी – रु. ६००/- नाव नोंदणी शुल्क + रु. १००/- प्रक्रिया शुल्क (Processing fee)

१०) विद्यार्थी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस कोणत्याही कारणामुळे प्रविष्ठ झाला नाही तरी त्याला शुल्क परत केले जाणार नाही. मात्र त्याने परीक्षेचे शुल्क भरले असल्यास नियमाप्रमाणे कपात करुन उर्वरित परीक्षा शुल्क परत मिळण्यास विशिष्ट प्रकरणात विद्यार्थी पात्र असेल.

- **ऑनलाईन अर्ज भरताना कोणतीही तांत्रिक अडचण आल्यास कार्यालयीन वेळेत दूरध्वनी क्रमांक ०२०-२५७०५२०७/२५७०५२०८ /२५७०५२७१ वर संपर्क साधावा.**

## कनिष्ठ महाविद्यालयांसाठी महत्वाच्या सूचना

१. अर्ज क्रमांक १७ कनिष्ठ महाविद्यालयामार्फत सादर करतांना मंडळाच्या निर्देशानुसार सर्व आवश्यक व वैध दस्ताऐवजासह परिपूर्ण प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

२. अर्ज क्रमांक १७ बहिस्थ विद्यार्थी म्हणून नावनोंदणीचा अर्ज आहे. परीक्षेचे आवेदनपत्र स्वतंत्र असते याबाबत विद्यार्थ्यांना स्पष्ट कल्पना द्यावी.

३. मंडळाच्या असे निदर्शनास आले आहे की, बरीच कनिष्ठ महाविद्यालये आपल्या परिसरातील इ. १०वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे तसेच आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचे नाव नोंदणी अर्ज (फॉर्म नं. १७) न स्वीकारता त्यांना व त्यांच्या पालकांना मंडळात थेट अर्ज भरा, अशी चुकीची माहिती देतात, त्यामुळे विद्यार्थी व त्यांचे पालक मंडळात वारंवार येतात व पर्यायाने त्यांना कनिष्ठ महाविद्यालयाने दिलेल्या चुकीच्या माहितीमुळे आर्थिक अडचणीना सामोरे जावे लागते व काही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहतात. तेव्हा याबाबत आपणांस पुनश्च कळविण्यात येते की, आपल्या परिसरातील दहावी उत्तीर्ण झालेल्या, तसेच आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील माजी विद्यार्थ्यांचे (इयत्ता ११ वी उत्तीर्ण/अनुत्तीर्ण) नाव नोंदणी अर्ज (फॉर्म नं. १७) स्वीकारून निर्धारित दिनांकास मंडळात सादर करावेत जेणेकरून हे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित न राहता शिक्षणाच्या प्रवाहात येतील.

४. खाजगी विद्यार्थी म्हणून प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांना नवीन/सुधारित अभ्यासक्रम लागू असून, नियमित विद्यार्थ्यांप्रमाणे त्यांची भाषा विषयातील तोंडी परीक्षा, प्रात्यक्षिक परीक्षा,श्रेणी, पर्यावरण अभ्यासक्रम व प्रकल्प पूर्ण करून घेण्याची जबाबदारी प्राचार्यांची राहील त्याबाबतचे विहित नमुन्यातील हमीपत्र (प्रपत्र क्रमांक-ब) नावनोंदणी अर्जासोबत (फॉर्म न.१७) जोडणे आवश्यक आहे.

५. मंडळाच्या असे निदर्शनास आले आहे की, इंग्रजी व उर्दू माध्यमाचे विद्यार्थी मराठी माध्यमाच्या कनिष्ठ महाविद्यालयामार्फत फॉर्म नं.१७ सादर करून खाजगीरित्या परीक्षेस प्रविष्ठ होतात. अशाप्रकरणी विद्यार्थ्यांच्या भाषाविषयक तोंडी परीक्षा घेण्यास मंडळास व पर्यायाने कनिष्ठ महाविद्यालयास अडचणी येतात. तेंव्हा आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात जे माध्यम असेल त्याच माध्यमाच्या विद्यार्थ्यांचे फॉर्म नं. १७ आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातून भरावेत याची कटाक्षाने नोंद घ्यावी.

६. ज्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्याला कला, शास्त्र व वाणिज्य शाखेत प्रवेश घ्यायचा असेल त्या कनिष्ठ महाविद्यालयास सदरच्या शाखेस मंडळाची मान्यता असणे आवश्यक आहे.

७. परराज्यातील विद्यार्थ्यांनी फॉर्म नं १७ भरला असेल तर ज्या कनिष्ठ महाविद्यालयामार्फत संबंधित विद्यार्थी परीक्षेचे आवेदनपत्र भरणार आहे त्या कनिष्ठ महाविद्यालयामार्फत योग्यता प्रमाणपत्र (Eligibility Certificate) अर्ज विभागीय मंडळाकडे येणे आवश्यक आहे.

८. ब-याच प्रकरणी उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालये पूर्ण कागदपत्र व माहिती विद्यार्थ्यांकडून न घेता नाव नोंदणी अर्ज मंडळाकडे सादर करतात. मंडळाने काही त्रुटी पूर्ततेसाठी पत्र पाठविल्यास ती त्रुटी पूर्ण न करता विद्यार्थ्यांशी संपर्क होऊ न शकल्याने त्रुटी पूर्तता करता येत नाही असे कळवितात. परंतु त्यांची ही कृती योग्य नाही. मंडळाने सूचित केल्याप्रमाणे दस्तऐवजासह परिपूर्ण अर्ज मंडळाकडे सादर करणे आवश्यक आहे.

९. विद्यार्थ्यांच्या अर्जासोबत छाननीसाठी प्राप्त झालेली मूळ कागदपत्रे अर्जाची छाननी झाल्यानंतर संबंधित कनिष्ठ महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांना परत करण्यात यावीत.

१०. नियम क्र.८९(३) अन्वये कोणत्याही उच्च माध्यमिक शाळेस/कनिष्ठ महाविद्यालयास त्यांचे माजी विद्यार्थ्यांसह ५० विद्यार्थ्यांच्या प्रवेश मर्यादित नावनोंदणी अर्ज स्विकारावेत. अपवादात्मक परिस्थितीत ५० विद्यार्थ्यांच्या प्रवेश क्षमतेपेक्षा जास्तीचे अर्ज प्राप्त झाल्यास विभागीय मंडळाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील.

११. विज्ञान शाखेस मान्यता असलेल्या उच्च माध्यमिक शाळेने/कनिष्ठ महाविद्यालयाने विज्ञान शाखा घेऊन परीक्षेस बसू इच्छिणा-या विद्यार्थ्यांचे नाव नोंदणी अर्ज मंडळाकडे पाठवावेत, तथापि कला व वाणिज्य शाखेसाठी विद्यार्थी राहत असलेल्या परिसरातील कोणत्याही कनिष्ठ महाविद्यालयातून नाव नोंदणी अर्ज (फॉर्म नं. १७) पाठविता येतील.

१२. *विद्यार्थ्यांच्या नोंदणी अर्जावर (फॉर्म नं.१७) चिकटविलेला फोटो प्राचार्यांनी प्रमाणित करणे आवश्यक आहे.*

१३. कोणत्याही खाजगी विद्यार्थ्यास तांत्रिक/व्यावसायिक/किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम गटातील विषय परीक्षेसाठी घेता येणार नाहीत, यांची स्पष्ट जाणीव विद्यार्थ्यास द्यावी तसेच विषय योजनेप्रमाणे विषयांची निवड विद्यार्थ्यांने केल्याची खात्री करावी. चुकीच्या विषयाची निवड विद्यार्थ्याने केल्याचे निदर्शनास आल्यास व त्यामुळे विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी प्राचार्याची राहील.

१४. परीक्षेचे आवेदनपत्र विद्यार्थ्याकडून निर्धारित मुदतीत भरून घेणे, विद्यार्थ्यांच्या तोंडी/प्रात्यक्षिक/श्रेणी/अंतर्गत मूल्यमापन परीक्षेचे आयोजन करून मंडळास निर्धारित मुदतीत गुण कळविणे, पर्यावरण विषयक अभ्यासक्रम व प्रकल्प पूर्ण करून घेऊन त्या विषयाची परीक्षा घेऊन निर्धारित मुदतीत मंडळास श्रेणी कळविणे याची संपूर्ण जबाबदारी प्राचार्याची आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

१५. मंडळ विनिमय क्र.८९ मधील सुधारित तरतुदीनुसार विभागीय मंडळाने ज्या उच्च माध्यमिक शाळेस/कनिष्ठ महाविद्यालयास चालू शैक्षणिक वर्षात प्रथम मान्यता दिलेली आहे, अशा उच्च माध्यमिक शाळांना/कनिष्ठ महाविद्यालयांना त्यांचे स्वतःचे माजी विद्यार्थी वगळता अन्य विद्यार्थ्यांचे अर्ज क्र. १७ पाठविण्यास ३ वर्षे बंदी करण्यात आलेली आहे याची कृपया नोंद घ्यावी.

१६. विनियम क्र.८९(१२) अन्वये प्रात्यक्षिक पूर्ण करून घेण्यासाठी शालेय शिक्षण मंत्रालय, मुंबई-३२ यांचे पत्र क्र. एसएससी/२००२ (२३१) उमाशि-२, दिनांक २६/११/२००२ नुसार खाजगी विद्यार्थ्यांनी

घेतलेल्या ज्या विषयात प्रात्यक्षिके विहित केलेली असतील त्या विषयातील प्रात्यक्षिके पूर्ण करण्यासाठी नाव नोंदणी अर्ज (फॉर्म नं. १७) पाठविणा-या उच्च माध्यमिक शाळेस/कनिष्ठ महाविद्यालयास खाजगी विद्यार्थ्यास सुविधा उपलब्ध करून देऊन त्यासाठी विद्यार्थ्याकडून एकत्रित शुल्क रूपये १००/- घेता येईल.

१७. प्रत्येक नाव नोंदणी अर्जासोबत (फॉर्म नं. १७) सादर केलेल्या सर्व कागदपत्रांची यादी जोडणे आवश्यक आहे. सदर यादी प्रत्येक अर्जासोबत स्वतंत्र असावी.

१८. खाजगी विद्यार्थ्याचे नाव नोंदणी अर्ज (फॉर्म नं.१७) स्वीकारताना ते आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील माजी विद्यार्थी, आपल्याच गावातील विद्यार्थी किंवा अपवादात्मक परिस्थितीत आपल्या तालुक्यातील विद्यार्थी यांचेच स्वीकारावेत. अपवादात्मक कारणास्तव स्विकारलेल्या इतर तालुक्यातील, जिल्हयातील व विभाग बदल करणा-या विद्यार्थ्यांचा रहिवासी पुरावा म्हणून रेशनकार्ड/आधारकार्ड, मतदार ओळखपत्र, बदली आदेशाची प्रत, सेवानिवृती आदेशाची प्रत असल्यासच नाव नोंदणी अर्ज स्वीकारावेत. विनाकारण इतर जिल्हयातील, तालुक्यातील किंवा इतर विभागातील विद्यार्थ्याचे नाव नोंदणी अर्ज (फार्म नं.१७) स्वीकारणाऱ्या उच्च माध्यमिक शाळेवर/कनिष्ठ महाविद्यालयावर मान्यता काढून घेण्यासारखी कारवाई करण्यात येईल तसेच जी उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय आपल्या महाविद्यालयातील माजी विद्यार्थ्यांचे आपल्या गावातील इ.१० वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे नाव नोंदणी अर्ज (फॉर्म नं. १७) स्विकारीत नाहीत अशी लेखी तक्रार प्राप्त झाल्यास प्राचार्यविरूद्ध योग्य ती कारवाई करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

१९. नाव नोंदणी अर्जातील सर्व माहिती अचूक भरलेली असावी.

२०. खाजगी विद्यार्थ्यांनी उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय सोडल्याचा दाखला मिळण्याबाबत अनेक अडचणी येतात व त्यामुळे त्यांना पुढील शिक्षणापासून वंचित राहावे लागते. या संदर्भात धोरणात्मक बाब म्हणून कळविण्यात येते की, आपल्या उच्च माध्यमिक शाळा /कनिष्ठ महाविद्यालयामार्फत नावनोंदणी करून परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यास उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय सोडल्याच्या दाखल्या ऐवजी (T.C.) सोबत दिलेल्या विहित नमुन्यातील(प्रपत्र क्र. – ब ) प्रमाणपत्र द्यावे.

२१. अपूर्ण/चुकीची माहिती नोंदविलेले, अपूर्ण कागदपत्र असलेले, कमी शुल्क भरलेले, पोस्टाने पाठविलेले नाव नोंदणी अर्ज (फॉर्म नं. १७) स्वीकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

२२. नाव नोंदणी अर्ज (फॉर्म नं. १७) हा परीक्षेचा फॉर्म नसून तो केवळ खाजगीरीतीने परीक्षेसाठी प्रविष्ठ होण्यास पात्रता ठरविण्यासाठी केलेला अर्ज आहे याची विद्यार्थ्यांना नाव नोंदणी अर्ज (फॉर्म नं.१७) भरतांनाच लेखी सूचना दयावी. मंडळाने त्यास पात्र ठरवून नाव नोंदणी प्रमाणपत्र दिल्यास त्यास परीक्षेचे आवेदनपत्र व आवश्यक शुल्क निर्धारित मुदतीत भरणे आवश्यक असल्याबाबत त्यांना लेखी सूचित करावे.

२३. विद्यार्थी विषय व शाखा बदल करिता ऐन वेळेस अर्ज करतात, त्यामुळे ते कोणते विषय घेणार याची माहिती अगोदरच घ्यावी. ज्या कनिष्ठ महाविद्यालयामार्फत खाजगी विद्यार्थी माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) हा विषय घेवून प्रविष्ट होणार असेल तर त्या कनिष्ठ महाविद्यालयास माहिती तंत्रज्ञान विषयास मान्यता असल्यास व सदर विद्यार्थ्यांची ऑनलाईन परीक्षा घेण्याची क्षमता, संगणक प्रयोगशाळा असल्यासच सदर विद्यार्थी माहिती तंत्रज्ञान विषयास प्रविष्ठ होऊ शकतो. तसेच त्याला प्रात्यक्षिक पूर्ण केल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.

२४. मंडळाकडे सादर करण्यात आलेल्या आवेदनपत्राबाबतची माहिती सर्व उच्च माध्यमिक शाळांनी/कनिष्ठ महाविद्यालयांनी सूचना फलकावर लावावी. सर्व प्राचार्यांनी स्वतः लक्ष घालून सर्व संबंधित विद्यार्थ्यांना परीक्षेच्या वेळापत्रकाबाबत सविस्तर सूचना द्याव्यात. विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे उच्च माध्यमिक शाळेने/कनिष्ठ महाविद्यालयाने मंडळाकडे सादर करणे, मंडळाकडून प्राप्त झालेल्या त्रुटींचा तपशील विद्यार्थ्यांना व पालकांना कळविण्याची जबाबदारी संबंधित प्राचार्यांची राहील.

२५. इतर राज्यातील विद्यार्थ्याचे नाव नोंदणी अर्ज (फॉर्म नं.१७) मंडळाकडे पाठविण्यापूर्वी मंडळाकडून योग्यता प्रमाणपत्र घेऊन ते योग्यता प्रमाणपत्र नाव नोंदणी अर्जासोबत (फॉर्म नं. १७) जोडणे आवश्यक आहे.

२६. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी) उत्तीर्ण झालेले विद्यार्थी अतिरिक्त विषय घेऊन (ISOLATED SUBJECT) प्रविष्ट होत असतील त्यासाठी फॉर्म नं. १७ भरण्याची आवश्यकता नाही. तसेच जे विद्यार्थी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस बसून अनुत्तीर्ण झालेले आहेत त्याना फॉर्म नं.१७. भरून खाजगीरीतीने परीक्षेस बसण्याची परवानगी घेण्याची आवश्यकता नाही. अशा विद्यार्थ्यांचे फॉर्म नं. १७ भरून मंडळाकडे नाव नोंदणीसाठी पाठवू नयेत.

२७. सदरील काम करणाऱ्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य/ज्येष्ठ शिक्षक व लिपिक यांना या कामाबाबत पुढील दराने मानधन देण्यात येईल

अ) मुख्याध्यापक तथा जेष्ठ शिक्षक

| | |
|---|---|
| १) १० विद्यार्थ्यांपर्यंत | रु. १५०/- |
| २) १० पेक्षा जास्त विद्यार्थी | रु. १५०+१०/- प्रती विद्यार्थी |
| ३) जास्तीत जास्त | रु. ५००/- |

ब) लिपिक –

| | |
|---|---|
| १) १० विद्यार्थ्यांपर्यंत | रु. १००/- |
| २) १० पेक्षा जास्त विद्यार्थी | रु. १००+१०/- प्रती विद्यार्थी |
| ३) जास्तीत जास्त | रु. २००/- |

नाव नोंदणी अर्ज (फॉर्म नं. १७) भरून खाजगीरीतीने उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ठ होऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी पात्रतेच्या अटी, शुल्काचा तपशील, अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे, प्राचार्यासाठी महत्त्वाच्या सूचना व इतर आवश्यक माहिती व विविध प्रपत्रे मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध होतील व यांची नोंद घेऊन नाव नोंदणी अर्ज (फॉर्म नं. १७) मंडळात निर्धारित दिनांकास सादर करण्याची व्यवस्था करावी.

**श्रेणी विषय**

<u>अनिवार्य विषय</u>

१) आरोग्य व शारीरिक शिक्षण :- गुण ५०

प्रश्न पत्रिका २५ गुण + प्रात्यक्षिक कार्य २५ गुण

५० गुणांपैकी प्राप्त गुणांचे श्रेणीत रूपांतर करण्यात येईल.

२) पर्यावरण शास्त्र व जलसुरक्षा :- गुण ५०

प्रश्न पत्रिका ३० गुण + वार्षिक कार्य २० गुण

५० गुणांपैकी प्राप्त गुणांचे श्रेणीत रूपांतर करण्यात येईल.

## विभागीय मंडळ स्तरावर करावयाची कार्यवाही

१) विभागीय मंडळामध्ये अर्ज प्राप्त झाल्यानंतर प्रचलित पध्दतीने अर्जाची छाननी करावयाची आहे. अर्जाची छाननी झाल्यानंतर सदर अर्जावर पात्र/अपात्र शेरा दिल्यानंतर संबंधित लिपीक, शाखाप्रमुख, शाखाधिकारी, सहा.सचिव/सहसचिव, व विभागीय सचिव यांच्या स्वाक्षऱ्या असणे अनिवार्य आहे. पात्र विद्यार्थ्यांचे नाव नोंदणी प्रमाणपत्र ऑनलाईन देण्यात येणार आहे.

२) आपल्या विभागीय मंडळामध्ये खाजगी विद्यार्थी संदर्भात स्वतंत्र शाखा असल्यास त्या संबंधित शाखेस स्वतंत्रपणे संगणक व नेट यंत्रणा उपलब्ध करुन देण्यात यावी.

३) सदर प्रक्रिया ऑनलाईन असल्याने यासंदर्भातील आपल्या स्तरावरील सर्व कामकाज विभागीय मंडळातील गणकयंत्र विभाग व खाजगी विद्यार्थी शाखा यांचेकडून समन्वयाने करुन घेण्यात यावे.

४) नावनोंदणी प्रमाणपत्रासाठी पात्र केलेल्या विद्यार्थ्यांच्या यादीची सॉफ्टकॉपी दरवर्षी ऑनलाईन विभागाकडे पाठविली जाते त्याचप्रमाणे सदर यादीची हार्डकॉपी देखील (Excel Copy) ऑनलाईन विभागाला पाठविण्यात यावी.

५) जे विद्यार्थी नावनोंदणी प्रमाणपत्र मिळण्यास पात्र ठरतील त्यांना कधी नावनोंदणी प्रमाणपत्र मिळतील याची माहिती विभागीय सचिवांना त्यांच्या मोबाईलवर ई–मेलव्दारे कळविण्यात येईल व त्यासाठी एक ओटीपी क्रमांक देण्यात येईल व सदरचा ओटीपी क्रमांक फक्त ६० मिनीटे कार्यरत राहील व याची माहिती मेसेज व्दारे संबंधित शाखेतील शाखाधिकारी, शाखाप्रमुख व लिपिक यांना कळविली जाईल.

६) वरीलप्रमाणे मुद्दा क्र.५ नुसार कार्यवाही करणेसाठी विभागीय मंडळाचे विभागीय सचिव, खाजगी विद्यार्थी शाखेचे संबंधित शाखाधिकारी, शाखाप्रमुख व लिपिक यांचे मोबाईल नंबर ऑनलाईन विभागास कळविण्यात यावेत.

७) खाजगी क्लासेसकडून जर विद्यार्थ्यांचे फॉर्म नं.१७ बंचमध्ये येत असतील तर त्याची नोंद स्वतंत्रपणे ठेवण्यात यावी व त्याची चौकशी करण्यात यावी.

८) एखादा अर्ज कागदपत्रांअभावी अपात्र ठरल्यास त्या विद्यार्थ्याकडून संबंधित कागदपत्रांची पूर्तता करुन घेवून अंतिम कार्यवाही करावी. अपात्र विद्यार्थ्यास प्रक्रिया शुल्काचे रु. १००/–वगळून उर्वरित रक्कम परत करण्यात यावी.

९) दिव्यांग विद्यार्थ्यांना खाजगीरित्या प्रविष्ट व्हायचे असेल तर त्यांनी त्यांच्या दिव्यांगत्वाचे जिल्हा शल्य चिकीत्सकांच्या/प्राधिकृत केलेल्या हॉस्पिटलच्या प्रमाणपत्राची छायाप्रत

प्रमाणित करुन अर्जासोबत सादर करावी. दिव्यांग विद्यार्थ्यांना विषययोजना तसेच परीक्षेसाठी असलेल्या सवलती याबाबत मार्गदर्शन करण्यात यावे.

१०) ज्या कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्याला कला, शास्त्र व वाणिज्य शाखेत प्रवेश घ्यायचा असेल त्या कनिष्ठ महाविद्यालयास सदरच्या शाखेस मंडळाची मान्यता असणे आवश्यक आहे.

११) पात्र विद्यार्थ्यांना नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांनी परीक्षेची आवेदनपत्रे मंडळाने विहित केलेल्या कालावधीत परीक्षा शुल्कासह भरणे आवश्यक असल्याबाबतची सूचना विद्यार्थ्यांना उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत करुन द्यावी

१२) परराज्यातील विद्यार्थ्यांनी फॉर्म नं.१७ भरला असेल तर, ज्या कनिष्ठ महाविद्यालयामार्फत संबंधित विद्यार्थी परीक्षेचे आवेदनपत्र भरणार आहे त्या कनिष्ठ महाविद्यालयामार्फत योग्यता प्रमाणपत्र (Eligibility Certificate) अर्ज विभागीय मंडळाकडे येणे आवश्यक आहे.

१३) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांनी नावनोंदणी ऑनलाईन करावयाची आहे. नावनोंदणी करताना विद्यार्थ्यांचा पत्ता, त्याने निवडलेली शाखा व माध्यम निहाय त्यास कनिष्ठ महाविद्यालयाची यादी दिसेल त्यामधील एका कनिष्ठ महाविद्यालयाची निवड विद्यार्थ्याने करावयाची आहे. या कनिष्ठ महाविद्यालयाव्दारे परीक्षा अर्ज, प्रकल्प, प्रात्यक्षिक/ तोंडी, श्रेणी परीक्षा दयावयाच्या आहेत. याबाबत सर्व कनिष्ठ महाविद्यालयांना आपण मार्गदर्शन करावे.

१४) १२ वी साठी विद्यार्थ्यांनी जे कनिष्ठ महाविदयालय निश्चित केले असेल त्या कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांची तोंडी, प्रात्याक्षिक, श्रेणी अंतर्गत मूल्यमापन परीक्षा घ्यावयाची आहे व यासंदर्भातील गुण ओएमआर (OMR) गुणपत्रिकेवर नोंदवून विहित मुदतीत विभागीय मंडळाकडे जमा करावयाचे आहे.

१५) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र इ.१२वी परीक्षेसाठी प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालयाने आपल्याच कनिष्ठ महाविद्यालयातील माजी विद्यार्थी,आपल्याच गावातील विद्यार्थी किंवा सध्याच्या पत्त्यानुसार नजिकच्या परिसरातील विद्यार्थी यांचेच फॉर्म प्रवेशित क्षमतेच्या मर्यादित (५०) स्विकारावेत. तसेच जे कनिष्ठ महाविद्यालय आपल्या माजी विद्यार्थ्यांचे तसेच आपल्या परिसरातील विद्यार्थ्यांचे नाव नोंदणी अर्ज (फॉर्म नं.१७) स्विकारीत नाहीत अशी तक्रार प्राप्त झाल्यास त्या कनिष्ठ महाविद्यालयाविरुध्द कारवाई करण्यात येईल असे सर्व कनिष्ठ महाविद्यालयांना सूचित करावे.

१६) ५० विद्यार्थी क्षमतेपेक्षा जास्त म्हणजे ५१ ते १०० विद्यार्थी क्षमतेसाठी संबंधित कनिष्ठ महाविद्यालयांनी परवानगी घेणे आवश्यक आहे. याबाबत ५० ची क्षमता वाढविणेसाठीचे अधिकार विभागीय अध्यक्षांना देण्यात येतील. याबाबत विभागीय मंडळाने कनिष्ठ महाविद्यालयांची लेखी मागणी आल्यानंतर प्रकरणिका सादर करुन विभागीय अध्यक्षांची मान्यता घेऊन लेखी पत्राव्दारे ऑनलाईन शाखा,राज्य मंडळ ,पुणे–४ यांना कळविणे आवश्यक आहे. तदूनंतरच वाढीव मर्यादा मान्य करण्यात येईल. सदरची ही वाढीव मर्यादा अंतिम असेल यानंतर विद्यार्थी क्षमता वाढविता येणार नाही याची नोंद घ्यावी.

१७) सदरील काम करणाऱ्या क.महाविद्यालयातील प्राचार्य /ज्येष्ठ शिक्षक व लिपीक यांना या कामाबाबत पुढील दराने मानधन देण्यात यावे.

अ) प्राचार्य तथा ज्येष्ठ शिक्षक –

| | |
|---|---|
| १) १० विद्यार्थ्यांपर्यंत | रू.१५०/- |
| २) १० पेक्षा जास्त विद्यार्थी | रू.१५०+१०/- प्रति विद्यार्थी |
| ३) जास्तीत जास्त | रू.५००/- |

ब) लिपिक –

| | |
|---|---|
| १) १० विद्यार्थ्यांपर्यंत | रू.१००/- |
| २) १० पेक्षा जास्त विद्यार्थी | रू.१००+१०/- प्रति विद्यार्थी |
| ३) जास्तीत जास्त | रू.२००/- |

१८) विद्यार्थ्यांच्या अर्जासोबत छाननीसाठी प्राप्त झालेली मूळ कागदपत्रे अर्जाची छाननी झाल्यानंतर उच्च माध्यमिक शाळा/क.महाविद्यालयांमार्फत विद्यार्थ्यांना परत करण्यात यावीत. सदर कागदपत्रे त्यांचेमार्फत विद्यार्थ्यांना परत मिळाल्याची खातरजमा करावी.

१९) प्राचार्य/जेष्ठ शिक्षक,लिपिक यांना अ.क्र. १७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे परीक्षा संपल्यानंतर विहित नमुन्यात देयके स्विकारुन मानधन अदा करावे.

प्रपत्र क्र.१

## खाजगीरीतीने प्रविष्ट होणा-या विद्यार्थ्याने भरून द्यावयाचे हमीपत्र

1. मी विद्यार्थी/विद्यार्थीनी ------------------------------------------------------------------------

यापूर्वी कधीही महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने घेतलेली उच्च माध्यमिक प्रमाणपत्र किंवा इतर कोणत्याही सांविधानिक मंडळ किंवा विद्यापीठ यांच्या इतर कोणत्याही समतुल्य परीक्षेस प्रविष्ट झालो/ झाले नाही किंवा उच्च परीक्षा उत्तीर्ण केलेली नाही.

2. मी सादर केलेला फॉर्म नं.१७ हा फक्त मी इ.१२ वी परीक्षेस बसण्यास पात्र आहे किंवा नाही यासाठी भरलेला आहे, याची मला पूर्ण जाणीव व माहिती आहे. मंडळाने मला पात्र ठरविल्याची माहिती मी स्वतः समक्ष माझ्या उच्च माध्यमिक शाळेकडून/कनिष्ठ महाविद्यालयाकडून घेईन व परीक्षेसाठी फॉर्म भरून देईन. अशाप्रकारे मी पात्र ठरून जर परीक्षेचा फॉर्म भरू शकलो/शकले नाही. तर त्या संबंधीची संपूर्ण जवाबदारी माझी राहील व त्याबद्दल मी कोणतीही तक्रार करणार नाही.

नोंदणी अर्ज क्र.-------------------

विद्यार्थ्याचा/विद्यार्थीनीचा पत्ता : ------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------

विद्यार्थ्याची/विद्यार्थीनीची स्वाक्षरी____________________

स्थळ :-------------------

मुख्याध्यापक/प्राचार्य (स्वाक्षरी)
उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचा शिक्का

टीप :- सदर हमीपत्र विद्यार्थ्याकडून दोन प्रतीत भरून घ्यावे. एक प्रत फॉर्म नं. १७ सोबत मंडळास पाठवावी व एक प्रत मुख्याध्यापक / प्राचार्यांनी आपल्या अभिलेखात जतन करून ठेवावी.

प्रपत्र क्र.२

शाळा/कनिष्ठ महाविद्यालय सोडल्याचा मूळ दाखला (Original T.C.) न जोडता दुय्यम दाखला (Duplicate T.C.) जोडल्यास कोर्ट फी रु. १०० /- च्या जनरल स्टॅम्प पेपरवर कार्यकारी दंडाधिकारी/ शासन नियुक्त नोटरी समोर तयार करावयाच्या प्रतिज्ञा पत्राचा नमुना

## प्रतिज्ञापत्र

मी (विद्यार्थ्याचे संपूर्ण नाव)--------------------------------------------------------------
श्री.--------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------- यांचा मुलगा/मुलगी/पत्नी
वय ------------ वर्ष व्यवसाय (धंदा) ------------------राहणार-----------------------------
सत्य प्रतिज्ञेवर लिहून देतो/देते की,

मी सन ------------- पासून---------------पर्यंत ------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------------
या शाळेत/कनिष्ठ महाविद्यालयात शिकत होतो/ होते. मी दिनांक ------------ रोजी शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय सोडली/सोडले आहे.

वर नमूद केलेल्या शाळेकडून/कनिष्ठ महाविद्यालयाकडून मला शाळा/कनिष्ठ महाविद्यालय सोडल्याचा मूळ दाखला (Original T.C.) मिळालेला होता. परंतु सदर दाखला मी फॉर्म नं. १७ सोबत उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ठ होण्यास परवानगी मिळविण्यासाठी सादर करू शकत नाही कारण -

(सूचना:- प्रतिज्ञापत्र मूळ दाखला का सादर करू शकत नाही, याचे कारण स्पष्ट व अचूक नमूद करावे.)
--------------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------------
--------- वर नमूद केलेल्या तारखेनंतर मी नियमित विद्यार्थी म्हणून कोणत्याही कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेतलेला नाही.

वरील माहिती खोटी असल्याचे आढळून आल्यास मी शिक्षेस पात्र राहीन याची मला जाणीव आहे.(मा. कार्यकारी दंडाधिकारी/शासन नियुक्त नोटरी यांच्या समोर स्वाक्षरी करीत आहे)

विद्यार्थी/ विद्यार्थीनी स्वाक्षरी---------------------

(माझ्या समक्ष) संपूर्ण नाव :-
(मा. कार्यकारी दंडाधिकारी/शासन नियुक्त नोटरी यांची स्वाक्षरी व शिक्का )

ठिकाण :-
दिनांक :-

**सूचना : प्रतिज्ञापत्रात मूळ दाखला का सादर करू शकत नाही, याचे कारण स्पष्ट व अचूक नमूद करावे.**

प्रपत्र क्र. (अ)

| उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय क्रमांक | J | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

भाषा विषय, तोंडी परीक्षा, पर्यावरण विषयाचा अभ्यासक्रम व प्रकल्प, प्रात्यक्षिके पूर्ण करून घेण्याबाबतचे हमीपत्र

जे विद्यार्थी आमच्या उच्च माध्यमिक शाळेमार्फत/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत नाव नोंदणी अर्ज (फॉर्म नं.१७) दाखल करून खाजगीरितीने फेब्रुवारी-मार्च/जुलै-ऑगस्ट २०२४ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ठ होणार आहेत अशा विद्यार्थ्यांच्या भाषा विषयाच्या तोंडी परीक्षा घेऊन, प्रात्यक्षिके पूर्ण करून घेऊन व परीक्षा घेऊन, पर्यावरण विषयाचा अभ्यासक्रम व प्रकल्प कार्य पूर्ण करून घेऊन निर्धारित मुदतीत मंडळास गुण/श्रेणी कळविण्याबाबत मी या पत्राव्दारे हमी देत आहे.

मुख्याध्यापक / प्राचार्य (स्वाक्षरी)

उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयाचे नांव व पत्ता

दिनांक:-__________ ------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

शिक्का

प्रपत्र—(ब)

कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव———————————————
Name of the Junior College

कनिष्ठ महाविद्यालय सांकेतिक क्र :———————————
Junior College Index No.:
युडायस क्रमांक :——————————
UDISE No.

जनरल रजिस्टर नोंदणी क्रमांक ——————
General Register Entry No.

खांजगी उमेदवारास द्यावयाचे प्रमाणपत्र
(जनरल रजिस्टर ठेवणे)
Certificate to be given to Private Candidate
(Maintain a General Register)

| अ.क्र. | तपशील | विवरण |
|---|---|---|
| १. | विद्यार्थ्याचे पूर्ण नाव<br>Name in full of the Student | |
| २. | आईचे नाव<br>Mother's Name | |
| ३. | जात व पोटजात<br>Caste and Sub Caste | |
| ४. | राष्ट्रीयत्व<br>Nationality | |
| ५. | धर्म<br>Religion | |
| ६. | जन्मस्थळ<br>Place of Birth | |
| ७. | जन्मतारीख महिना व वर्ष<br>(ख्रिस्ती शकाप्रमाणे अंकी व अक्षरी)<br>Date of Birth, Month & Year<br>(In figures & words as per Christian calendar) | |
| ८. | मातृभाषा<br>Mother Tongue | |
| ९. | खाजगी विद्यार्थी नोंदणी पूर्वीची शाळा<br>Former School attended by the Private Candidate | |
| १०. | नोंदणी केल्याची तारीख<br>Date of Registration | |
| ११. | इ.१०वी उत्तीर्ण तारीख<br>Date of Passing Std. X | |
| १२. | इ.१२ वी परीक्षा बैठक क्रमांक व उत्तीर्ण वर्ष<br>Seat No. & Year of Passing Std.XII | |

वरील माहिती ——————————————————————— या कनिष्ठ महाविद्यालयातील जनरल [illegible]
नोंदणी क्र. —————— कनिष्ठ महाविद्यालय सोडल्याचा दाखला क्र. —————— नुसार प्रमाणित करण्यात येत आहे.
The information above is certified as per the General Register no. ________ and College Leaving Certificate No. ________ of ______________________________ College.

दिनांक – ..................
Date - ____________

प्राचार्य,
स्वाक्षरी व कनिष्ठ महाविद्यालय शिक्का
Principal Sign & Stamp of Jr. College

प्रपत्र क्र. (क)

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब/मार्च नावनोंदणी शुल्क जमा करण्याबाबतचे विवरणपत्र

| उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय क्रमांक | J | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव व पत्ता : - ______________________

______________________________________________

______________________________________________

| अ. क्र. | तपशील | शुल्क | विद्यार्थी संख्या | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | नावनोंदणी शुल्क | रु. १००/- (प्रत्येक विद्यार्थ्यासाठी) | | |
| २ | अर्ज छाननी शुल्क (अर्ज छाननी, पत्रव्यवहार, इ. प्रशासकीय खर्च) | रु. १००/- (प्रत्येक विद्यार्थ्यासाठी) | | |
| ३ | विलंब शुल्क | रु. २५/- (प्रत्येक विद्यार्थ्यासाठी) | | |
| ४ | अतिविलंब शुल्क | रु. २०/- (प्रति दिन) | | |
| | एकूण | | | |

<u>धनाकर्ष / चलनाचा तपशील -</u>

१ बँकेचे नाव - ______________________

२ धनाकर्ष क्र. - ______________________

३ रक्कम रु - ______________________

४ दिनांक - ____________

चलनाची प्रत जोडावी

दिनांक : -

मुख्याध्यापक/प्राचार्य (स्वाक्षरी)

उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठा महाविद्यालयाचा शिक्का

Divisional Boards address

| | |
|---|---|
| 1. PUNE -<br><br>The Divisional Secretary<br>Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education.<br>Pune Divisional Board.<br>Shivajinagar, Pune 411 005.<br>Ph.No. 020-25536781/2/3<br><br>MAHARASHTRA STATE | 6. Amravati<br><br>The Divisional Secretary<br>Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education.<br>Amravati Divisional Board, Shastri Nagar Amravati 444 602.<br>Ph.No.0721-2662647<br><br>MAHARASHTRA STATE |
| 2. NAGPUR<br><br>The Divisional Secretary<br>Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education.<br>Nagpur Divisional Board, Civil Lines.<br>Nagpur 440 001.<br>Ph.No.0712-2565403/2553507/ 2553503<br><br>MAHARASHTRA STATE | 7. NASIK<br><br>The Divisional Secretary<br>Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education.<br>Nasik Divisional Board, S.No.,1560/1<br>Aadgaon Shivar, Aadgaon, Nasik 422 003.<br>Ph.No.0253-2950410/2945241/2945251<br><br>MAHARASHTRA STATE |
| 3. AURANGABAD<br><br>The Divisional Secretary<br>Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education. Aurangabad Divisional Board, Station Road, Aurangabad 413 005.<br>Ph.No.0240-2334228/2334284<br><br>MAHARASHTRA STATE | 8. LATUR<br><br>The Divisional Secretary<br>Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education.<br>Latur Divisional Board, Sutmill Area, Behind Rajasthan Highschool,<br>Latur 413 531<br>Ph.No.02382-251733/251633<br><br>MAHARASHTRA STATE |
| 4. Mumbai<br><br>The Divisional Secretary<br>Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education.<br>Mumbai Divisional Board, Sector No.16-A,Washi Navi Mumbai 400 703<br>Ph.No.022-27881075/27893756<br><br>MAHARASHTRA STATE | 9. KOKAN<br><br>The Divisional Secretary<br>Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education.<br>Kokan Divisional Board, MIDC, E77/06, Mirjole, Ratnagiri 415 612.<br>Ph.No.02352-228480/231250<br><br>MAHARASHTRA STATE |
| 5.Kolhapur<br><br>The Divisional Secretary<br>Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education.<br>Kolapur Divisional Board, Rajendra Nagar, Near Kolhapur Vidyapeeth, Kolhapur - 416003.<br>Ph.No.0231-2696101/2/3<br>0231-2690829<br>MAHARASHTRA STATE | |